# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य महाराष्ट्र State जिल्हा मुंबई District पोलीस ठाणे ला.प्र.वि. Police Station पहिली खबर क्र. 04 FIR No. वर्ष 2026 Year दिनांक ........ Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम 1988 कलमे Sections ........
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day मंगळवार तारीख पासून Date from 03/02/26 वेळ Time 16:00 तारीख पर्यंत Date to 19/02/26 वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 03/02/2026 वेळ Time 16:00 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 06/2026 तारीख Date 19/02/2026 वेळ Time 08.44

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. पूर्वेस २ कि.मी. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name कुरार पो. ठाणे ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री संदीप पाटील
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री [illegible] पाटील
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 42 वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. [illegible]
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........
   (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिंदू जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address भाग्यलक्ष्मी गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ /नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road मु.पो. माळेगाव जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ता. मालेगाव जि. नाशिक पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   1.) संजीव [illegible] वय ५४ वर्षे पद पोलीस उपनिरीक्षक [illegible] (कुरार पो.ठाणे) [illegible] रूम नं. 506 [illegible] नगर बोरिवली (पू) मुं 66 [illegible]
   2.) ज्ञानेश्वर [illegible] पद [illegible] वय ३८ वर्षे पद पोलीस शिपाई [illegible] रूम नं अ/501, [illegible] बोरिवली (पू) मुं (कुरार पोठाणे)

(G.C.P.) K 1043 (A) (1000-1-2025)

फिर्याद

मी - संदीप केदराज पाटील वय 41, वर्षे धंदा - नोकरी (पोलीस निरीक्षक लाप्रवि मुं) रा.ठि. भाग्य-लक्ष्मी कॉलनी मितानगर मालेगाव ता. मालेगाव जि. नाशिक माझी फिर्याद स्वतंत्र कागदावर घेण्यात आली असून तीचे गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात यावे.

समक्ष,

(अनिल चिलारवाड)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
बृहन्मुंबई विभाग मुंबई.

फिर्याद

दिनांक १९/०२/२०२६

मी, संदिप केदारज पाटील, वय ४१ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक – लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मोबाईल नंबर ७७७४८९९७२५.

---

मी वरील प्रमाणे असून, दिनाक ०१/०८/२०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.

मी मंगळवार, दिनांक ०३/०२/२०२६ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्रमांक १०/२०२६ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता चौकशी अधिकारी म्हणून माझी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन पोलीस निरीक्षक, गणपत परचाके यांची नेमणुक केल्याबाबत आदेश मिळाल्याने नमुद पडताळणीमधील तक्रारदार श्री. रविंद्रकुमार परमानंद यादव यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. तेव्हा तक्रारदार यांनी सांगितले की, तक्रारदार श्री रविंद्रकुमार यादव यांचे विरोधात कुरार पोलीस स्टेशन अंतर्गत बलजीत सिंग भाटीया यांने फसवुणकी संदर्भात अर्ज केला आहे. तसेच अशाप्रकारचे अनेक अर्ज अंबोली पोलीस ठाणे, पार्ले पोलीस ठाणे, वाशी पोलीस ठाणे, गुन्हे शाखा युनिट १२ अशाठिकाणी तक्रारदार यांचे विरोधात फसवणुकीचे अर्ज दाखल केले आहेत.

बलजीत सिंग भाटीया यांनी केलेल्या अर्जाच्या अनुषगांने दि. १९/१२/२०२५ रोजी कुरार पोलीस स्टेशन वरून तक्रारदार यांना नोटीस अदा केली सदर नोटीसच्या अनुषगांने तक्रारदार यांना वेळोवेळी बोलावून त्यांचा जबाब नोंद करण्यात आला आहे. अंबोली पोलीस ठाणे, पार्ले पोलीस ठाणे, वाशी पोलीस ठाणे, गुन्हे शाखा युनिट १२ या पोलीस स्टेशनमी बलजीत सिंग भाटीया यांने तक्रारदार यांचेवर केलेल्या अर्जाची चौकशी करून त्यांची चौकशी बंद करण्यात आली आहे. परंतु कुरार पोलीस स्टेशने तक्रारदार यांचेवर सुरू असलेली सदरची चौकशी बंद करणे करीता त्याच्यासाठी लाचेची मागणी केली.

दि.२२/०१/२०२६ रोजी कुरार पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे यांनी तक्रारदार यांना पोलीस स्टेशनला बोलवले. त्यावेळेस वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे यांनी तक्रारदार यांना त्याच्या केबीनमध्ये बोलावून बलजीत सिंग भाटीया यांनी केलेल्या अर्जाची विल्हेवाट लावणे कामी रू. ०३ लाख इतकी लाचेची मागणी करून सदरची रक्कम ही तात्काळ देण्यास सांगितली व जर ती रक्कम तात्काळ दिली नाही तर तक्रारदार यांना लॉकअप मध्ये ठेवण्यात येईल असे सांगण्यात आले.

तसेच तक्रारदार यांचा भाऊ पवन यादव हा ट्रान्सजेंन्डर असून त्यांला वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे यांने बोलावून घेऊन सांगितले की, पवन यादव हा वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे व बलजीत सिंग भाटीया यासाठी काम करीत आहे. तेव्हा वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे यांनी तक्रारदार यांस सांगितले की, लाचेची रक्कम दिली नाही तर पवन यादव हा तक्रारदार यांचेवर बलात्काराचा गुन्हा दाखल करेल. तेव्हा वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे हे तक्रारदार यांना बळजबरीने लाचेची रक्कम देण्याकरीता धमकी देत होते.

वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे व पोलीस उप निरीक्षक जुन्ने यांनी पवन यादव यांचा जबाब नोदवून तक्रारदार यांना बलात्काराच्या गुन्हयामध्ये चुकीच्यारीतीने अडकविण्याचा प्रयत्न केला तसेच त्यांना सहा तास लॉकअप मध्ये बसवून ठेवले. त्यांच दिवशी बलजीत सिंग भाटीया व पवन यादव यांचे अर्ज वंद/तडजोड करणेकरीता तक्रारदार यांना रू. ३,००,०००/– लाखाची मागणी केली. त्यावेळेस ते घाबरल्याने दिनांक २२/०१/२०२६ रोजी त्याच्याकडे रक्कम ३,००,०००/– रू. लाचेची मागणी केली व आगाऊ रक्कम २,००,०००/– रू. हे तक्रारदार यांनी वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे व पोलीस उप निरीक्षक जुन्ने यांना दिले त्यामधील १,००,०००/– रू. हे तक्रारदार कडे शिल्लक होते.

19.2.26

तसेच दि. ३०/०१/२०२६ रोजी कुरार पोलीस स्टेशन येथून दोन कर्मचारी हे साध्यावेषात तक्रारदार यांचे कार्यालयात जावून त्यांनी सांगितले की, वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे यांनी तक्रारदार यांना तात्काळ पोलीस स्टेशन येथे बोलावले आहे जर तक्रारदार हयांनी रू. २५ लाख दिले नाही तर पवन यादव हा तक्रारदार यांचेवर बलात्काराचा गुन्हा दाखल करेल.

पोलीस उप निरीक्षक जुन्ने यांनी तक्रारदार यांचेकडे रू. १,००,०००/— ची मागणी करून सदरचे दोन्ही प्रकरण हे बंद करून टाकेन आणि वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे हे सुदधा भविष्यात कोणतीही कार्यवाही करणार नाही. परंतु तकारदार यांना लोकसेवक पोलीस उप निरीक्षक जुन्ने व लोकसेवक वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक ०३/०२/२०२६ रोजी लेखी तक्रार अर्ज दिला.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे **१)** श्री नवनीत नरपत वळवी, वय ३२ वर्षे, व्यवसाय — नोकरी, पद — सहा. मोटार वाहन निरिक्षक, कार्यालयीन पत्ता — प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली, मुंबई राठि — रूम नं. १००१, एव्हरशाईन अमावी, बिल्डींग नं. १९, गोल्बल सिटी, विरार (प) मुंबई मोबाईल नंबर ९७६५२११७८१, **२)** श्री युवराज दादासाहेब शिर्के, वय ४५ वर्षे, व्यवसाय — नोकरी, पद — सहा. मोटार वाहन निरिक्षक, कार्यालयीन पत्ता — प्रादेशिक परिवहन कार्यालय, वडाळा, मुंबई राठि — १९०७, ज्ञानज्योती सोसायटी पी १, कर्वे नगर, कांजूर मार्ग (पूर्व), मुंबई. मोबाईल क्रमांक ८८९४२३२७९७ यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचांचा तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून आम्ही व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन पोनि गणपत परचाके तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

तद्नंतर पोनि परचाके यांनी पंचासमक्ष सांगितले की, तक्रारदार श्री. रविंद्रकुमार परमानंद यादव हे लोकसेवक यांची त्यांच्या कार्यालयात जावुन प्रत्यक्ष भेट घेवून त्यांची लाच मागणीबाबत पडताळणी कारवाई करणार आहे.

त्यानंतर आम्ही दिनांक ०४/०२/२०२६ रोजी १०.२० वा. लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या तक्रारदार यांचे फॉर्च्युनर मो/कार क्र. एम.एच. ४७ बी.टी. ८२२३ मध्ये आम्ही स्वत:, सापळा पथक व उर्वरीत पोलीस पथकास टॅक्सीने हब मॉल, गोरेगाव (प), मुंबई याठिकाणी आलो. त्यानंतर तक्रारदार यांचे वाहनामध्ये माझे, तक्रारदार व पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

त्यानंतर १३:२० वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून आम्ही स्वत: तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बनियनला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही, अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. ०२ श्री. शिर्के हे तक्रारदार यांचे मो/कारने लोकसेवक यांना भेटण्यासाठी रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच श्री. वळवी हे दिलेल्या सुचनेप्रमाणे परत आले असता त्याच्यामधील झालेल्या मोबाईल वरील संभाषणामध्ये लोकसेवक श्री. जुन्ने यांनी तक्रारदार यांचेकडे लाचे संदर्भात कोणतेही भाष्य न करता सायंकाळी ०७.०० वा. लोकसेवक श्री तावडे यांना भेटण्यास सांगितले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. ०२ श्री. शिर्के हे तक्रारदार यांचे मो/कारने लोकसेवक वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री तावडे यांना भेटण्यासाठी रवाना केले व उर्वरीत पथक पोलीस गार्डनमध्ये थांबले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच श्री. वळवी हे गार्डनजवळ परत आले. त्यावर तक्रारदार यांचेकडे विचारणा केली असता असे समजले कि, लोकसेवक श्री तावडे यांनी त्यांचे ऑर्डरली मार्फत

19-2-26

लोकसेवक श्री जुन्ने हे सुट्टीवरून आल्यानंतर भेट घेवू असा निरोप तक्रारदार यांना दिला. सदरबाबत कारवाई दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, वरीलप्रमाणे समजून आले.

त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री जुन्ने यांना मोबाईलवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता, लोकसेवक श्री जुन्ने यांचा मोबाईल नेटवर्कमध्ये नसल्याचे समजून आले. म्हणून दिनांक ०४/०२/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करून लोकसेवक श्री जुन्ने सुट्टीवरून हजर झाल्यानंतर किंवा त्यांनी तक्रारदार यांना संपर्क केल्या पुन्हा पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले व त्याप्रमाणे पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

तक्रारदार यांनी कळविल्याने दिनांक १६/०२/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. आम्ही सर्व सुमारे ११.०० वा. लाप्रवि. कार्यालयातुन बाहेर पडलो. तसेच पडताळणीवेळी खाजगी टॅक्सी मधून जाणार असल्याचे पंचाना सांगितले. सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार आणि दोन पंच सह टॅक्सीमध्ये बसले. व दोन्ही टॅक्सी एका मागोमाग गोरेगाव (प), मुंबई येथील बृहन्मुंबई महानगर पालिका, महाराष्ट्र भूषण डॉ नानासाहेब धर्माधिकारी उद्यानजवळ नेण्यास सांगितले. आम्ही नमूद उद्यानामध्ये गेलो व तेथून तक्रारदार यांना संपर्क करून वर नमुद ठिकाणी येण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी ते कामानिम्मीत कोर्टामध्ये असून काम पुर्ण करून वर नमुद ठिकाणी येतो असे सांगितले.

थोडयावेळाने तक्रारदार यादव हे फॉर्च्युनर मो/कार क्र. एम.एच. ४७ बी.टी. ८२२३ सह गार्डनच्याबाहेर आले त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पोह रावराणे यांनी दिनांक ०४/०२/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये वापरण्यात आलेले सीलबंद मेमरी कार्ड हे पंचासमक्ष उघडले. सदर मेमरी कार्डमध्ये माझे, पंचांचे व तक्रारदार यांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून १५.५६ वा. तक्रारदार यांनी पचांसमक्ष त्यांचे मोबाईल नंबर ८१०४३७३७९६ वरून लोकसेवक श्री जुन्ने यांचे मोबाईल नंबर ९०११३५२४०६ वर व्हॉट्सअप कॉल केला असता, तक्रारदार व लोकसेवक श्री जुन्ने यांचेमध्ये कामा संबधीत चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी लोकसेवक श्री जुन्ने यांना फुरकान यास मध्ये न घेता आपणच जे काही असे ते बोलणे करू असे सांगितले असता, तक्रारदार यांनी लोकसेवक श्री जुन्ने यांना रात्री आठ नऊ वाजता बोरीवली पश्चिम याठिकाणी एकटेच भेटण्याकरीता बोलावून कॉल कट केला.

त्यानंतर सापळा पथक, पंच व तक्रारदार यांचे फॉर्च्युनर मो/कार क्र. एम.एच. ४७ बी.टी. ८२२३ आणि खाजगी टॅक्सीने बोरीवली पश्चिम येथे मोक्ष प्लाझा मॉलजवळ कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीलो.

त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून २०.०७ वा. तक्रारदार यांनी पचांसमक्ष त्यांचे मोबाईल नंबर ८१०४३७३७९६ वरून लोकसेवक श्री जुन्ने यांचे मोबाईल नंबर ९०११३५२४०६ वर व्हॉट्सअप कॉल केला असता लोकसेवक श्री जुन्ने यांनी त्यांचा कॉल उचलला नाही. त्यानंतर आम्ही सर्व समोरून लोकसेवक श्री जुन्ने हे कॉल करतील म्हणून थांबून राहीलो.

काही वेळाने २०.४९ वा. तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरून लोकसेवक श्री जुन्ने यांना पुन्हा कॉल केला असता त्यांचमध्ये बोलणे झाले. चर्चे दरम्यान लोकसेवक श्री जुन्ने यांनी तक्रारदार यांना दहा ते पंधरा मिनिटांमध्ये बोरीवली कोर्ट परिसरामध्ये भेटण्याकरीता बोलाविले.

त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून आम्ही स्वत: तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बनियनला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही, अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. ०२ श्री. शिर्के हे तक्रारदार यांचे मो/कारने लोकसेवक यांना भेटण्यासाठी रवाना झाले.त्यावेळेस तक्रारदार व लोकसेवक यांच्यामध्ये कामा संबधीत चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार हे लोकसेवक श्री जुन्ने

14.2.26

श्री संदिप केदराज पाटील यांचा फिर्यादी जबाब पुढे चालु....

यांना 'एक लाख ना, तो एक लाख मे आपको कितना देना, उनको कितना देना' असे बोलेले असता, लोकसेवक श्री जुन्ने यांनी 'सब मै साहब को ही दुंगा, साहब मुझे क्या करेंगे मुझे पता नही, मै तो साहब के हाथ मे दुंगा, साहब रवि ने ये दिया है, बस्स' असे तक्रारदार यांना बोलले. पुढे चर्चे दरम्यान लोकसेवक श्री जुन्ने यांनी तक्रारदार याना ' और जो भी करना है परसो के दिन करिये, नो डाऊट, मेरा कुछ, लेकीन मै सच काम कर रहा हु' असे बोलून तक्रारदार याना परवा भेटण्याकरीता पोलीस ठाणेस बोलावून त्यावेळी लोकसेवक श्री तावडे यांचेसोबत बोलणे करू म्हणून सांगितले. म्हणून दिनांक १६/०२/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करून लोकसेवक श्री जुन्ने यांनी दि. १८/०२/२०२६ रोजी तक्रारदार यांना बोलावले वरून पुन्हा पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले व त्याप्रमाणे पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

दिनांक १८/०२/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ठरल्याप्रमाणे आम्ही सर्व लाप्रवि. कार्यालयातुन बाहेर पडलो. सापळा पथकातील अंमलदारांना दोन खाजगी टॅक्सी थांबविल्या व दोन टॅक्सीमध्ये सापळा पथक व पंच बसले. व दोन्ही टॅक्सी एका मागोमाग येथील हब मॉल, गोरेगाव (प), मुंबई नेण्यास सांगितले. . थोडयावेळाने तक्रारदार यादव हे फॉर्च्युनर मो/कार क्र. एम.एच. ४७ बी.टी. ८२२३ सह गार्डनच्याबाहेर आले

त्यानंतर, माझे सुचनेप्रमाणे पोह रावराणे यांनी दिनांक ०४/०२/२०२६ व दिनांक १६/०२/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये वापरण्यात आलेले सीलबंद मेमरी कार्ड हे पंचासमक्ष उघडले. त्यांनतर तक्रारदार यांचे वाहनामध्ये सदर मेमरी कार्डमध्ये माझे, पंचांचे व तक्रारदार यांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

मी व पोनि परचाके यांनी तक्रारदार व पंच श्री शिर्के यांना पडताळणी कारवाईच्या आवश्यक त्या सुचना दिल्या. मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजुस बनियानला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच श्री शिर्के हे लोकसेवक यांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी तक्रारदार यांचे मोटार कारने गेले. काही वेळानंतर तक्रारदार व पंच शिर्के पथकाजवळ परत आले असता मी पंच वळवी यांचे समक्ष तक्रारदार यांच्याकडे विचारणा केली असता, तक्रारदार हे कुरार पोलीस स्टेशन येथे पंच शिर्के सोबत गेले त्यावेळी लोकसेवक जुन्ने यांची भेटी घेतली त्यावेळी भेटीदरम्यान लोकसेवक श्री जुन्ने यांनी तक्रारदार यांना हाताचे एक बोट उचावून इशारा केला त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री जुन्ने यांना 'कितना बोले? एक लाख' असे बोलले असता, लोकसेवक श्री जुन्ने यांनी तक्रारदार यांना 'पहिले ही बोला था, वो आपकी इच्छा है तो, साहब ने ऐसा, क्युंकी वो वो बोले की उसको परेशान करने का अपना कुछ इरादा नही है, उसको जानता है, बात अलग है हमने कुछ कंडिशन नही रख्खी है, और आगे से भी ऐसी कुछ परेशानी का बात नही है, ऐसा है, मै, उनको देदो, जो मुझे देंगे वो साहब देंगे, और कुछ बोलने का है साहब को ? असे बोलेले त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री जुन्ने यांना एकदा लोकसेवक श्री तावडे यांचेसोबत समक्ष भेट घालून देण्यास सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक श्री जुन्ने यांनी तक्रारदार व लोकसेवक श्री तावडे यांची समक्ष भेट घालून दिली. भेटी दरम्यान लोकसेवक श्री तावडे, श्री जुन्ने व तक्रारदार यांचेमध्ये कामा संबधीत चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी लोकसेवक श्री जुन्ने यांचे समक्ष लोकसेवक श्री तावडे यांना ' सर ने एक लाख बोला है' असे सांगितले असता, लोकसेवक श्री तावडे यांनी तक्रारदार यांना 'हा' असे बोलले. त्यावर तक्रारदार हे 'तो इनको देदु की' असे विचारले असता, लोकसेवक श्री तावडे यांनी तक्रारदार यांना ' हा देदो ना इनके पास चलेगा' असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी 'इनके पास देदु तो चलेगा' असे विचारले असता, लोकसेवक श्री तावडे यांनी 'हा, काय प्रॉब्लेम नाय ना, खुशी से दे रहा है ना भाई, इसमे कोई ये नही' असे बोलून श्री तावडे यांनी श्री जुन्ने यांना घेऊन टाका असे बोलले असता श्री जुन्ने यांनी हा असे बोलुन तक्रारदार यांचे कडून लाचेची रक्कम स्विकारण्यास स्विकृती दर्शवली आहे. त्यानंतर आम्ही व पोनि परचाके यांनी पंचासमक्ष रेकार्डवरील संभाषण ऐकले असता वरील प्रमाणे मागणी असल्याचे निष्पन्न झाले. तसेच पंच शिर्के यानी भेटी दरम्यान लोकसेवक जुन्ने व तावडे यांनी लाचेची मागणी केली असल्याचे संभाषण ऐकले व पाहिले असल्याचे आम्हाला सांगितले.

19.2.20

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये १,००,०००/— इतकी रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. १,००,०००/— (त्यामध्ये रू. ५००/— दराच्या भारतीय चलनाच्या २०० नोटा) यांच्या मोबाईल फोनमध्ये फोटो काढण्यात आले. त्यानंतर पो.नि. परचाके यांनी पंच व तक्रारदार यांना अॅन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. पोशि गणेश सोनावणे यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रूपये २००/— रक्कमेतील नोटांना अॅन्थ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम एका पांढऱ्या रंगाच्या पाकीटामध्ये ठेवुन सदर पाकीटास देखील दोन्ही बाजूने अॅन्थ्रोसिन पावडर लावून ते पाकीट तक्रारदार यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवले. त्यानंतर पोशि गणेश सोनावणे हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले. तसेच लोकसेवक जुन्ने यांनी लाच स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी स्वत:चे ईन केलेले शर्ट बाहेर काढून सापळा पथकाला दिसेल असा लाच स्विकारल्याचा इशारा करावा. तसेच सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना एकत्र करून खबरदारीच्या सुचना आम्ही दिल्या.

त्यानंतर सापळा कारवाईकरीता सापळा पथक व पंच, तक्रारदार असे तक्रारदार यांच्या वाहनाने आणि खाजगी वाहनाने कुरार पोलीस स्टेशन येथे आम्ही सर्व काही अंतरावर थांबलो व मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच शिर्के हे लाचेच्या रक्कमेसह कुरार पोलीस ठाणेच्या दिशेने चालत रवाना झाले त्यांच्या मागोमाग आम्ही पथक व पंच वळवी चालत गेलो. ठरल्याप्रमाणे पोनि परचाके व काही सापळा पथक हे कुरार पोलीस ठाणेच्या आवारात कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे थांबून राहीलो. काही वेळाने तक्रारदार व पंच श्री शिर्के हे चालत प्रथम लोकसेवक बसत असलेल्या केबीन नं २३ जवळ आले व तक्रारदार हे लोकसेवक बसलेल्या केबीन मध्ये एकटेच गेले तसेच पंच शिर्के हे केबीनच्या बाहेर उपस्थित होते.

काही वेळाने तक्रारदार व पंच श्री शिर्के हे पोलीस ठाणेच्या बाहेर आले सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच मी व सोबतच्या सापळा पथकाने लागलीच लोकसेवक जुन्ने यांना १७.०५ वा. ताब्यात घेतले.. त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव ज्ञानेश्वर गोविंदराव जुन्ने, वय ३९ वर्षे, नोकरी (पोलीस उप निरीक्षक), राठि — बिल्डिंग क्र एन/५४, ५ वा माळा, ए/५०१, योगी नग, पोलीस वसाहत बोरीवली पश्चिम, मुंबई. असे सांगितले. त्यानंतर पोनि परचाके व सोबत असलेल्या पथकाने पोलीस ठाणेमधील वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांचे कक्षामध्ये असलेल्या लोकसेवकास ताब्यात घेतले. त्यावर त्याना त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यानी त्याचे नाव श्री संजीव बळीराम तावडे, वय ५७ वर्षे, पद वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नेमणुक कुरार पोलीस ठाणे, रा.ठी. ए/४०६, सामवेद बिल्डिंग, राजेंद्र नगर, बोरीवली पुर्व मुंबई असे सांगितले.

मी लोकसेवक ज्ञानेश्वर गोविंदराव जुन्ने यांस लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यानी योग्य उत्तर दिले नाही सदर लाचेच्या रक्कमेबाबत तक्रारदारास विचारले असता तक्रारदार यांने पोलीस ठाणे मध्ये रूम २३ मधील लोखंडी कपाटावरती लाचेची रक्कम पोलीस उप निरीक्षक ज्ञानेश्वर गोविंदराव जुन्ने यांचे इशाराद्वारे सांगणेवरून ठेवलेली सांगितली. त्यानुसार पंचासमक्ष पाहणी करता लोखडी कपाटावर लाचेचे रक्कमेचे पाकीट मिळुण आल्याने पंचासमक्ष मोबाईलमधील फोटो वरून पाहणी केली असता सदर पाकीटातील रक्कम तंतोतंत मिळून आले.

लोकसेवक संजीव बळीराम तावडे व ज्ञानेश्वर गोविंदराव जुन्ने यांचे सह लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तरी दिनांक ०४/०२/२०२६, दि. १६/०२/२०२६ आणि दि. १८/०२/२०२६ रोजी केलेल्या पडताळणी/सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक संजीव बळीराम तावडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व लोकसेवक ज्ञानेश्वर गोविंदराव जुन्ने, पोलीस उप निरीक्षक नेमणुक— कुरार पोलीस स्टेशन, मुंबई यांनी तक्रारदार यादव

यांचेकडे कुरार पोलीस येथे दाखल असलेल्या आर्थिक फसवणुकीचे व लैंगीक शोषणाचे तक्रारी वरून गुन्हा दाखल न करण्यासाठी लोकसेवक संजीव बळीराम तावडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व लोकसेवक ज्ञानेश्वर गोविंदराव जुन्ने, पोलीस उप निरीक्षक यांनी एक लाख रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे कबुल केले. तसेच सदरची लाचेची रक्कम लोकसेवक तावडे यांच्या सांगण्यावरून लोकसेवक ज्ञानेश्वर गोविंदराव जुन्ने यांनी स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक संजीव बळीराम तावडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व लोकसेवक ज्ञानेश्वर गोविंदराव जुन्ने, पोलीस उप निरीक्षक नेमुणक– कुरार पोलीस स्टेशन यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(अनिल चित्तरवाड)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

19.2.26

दाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ……………… तात्काळ ………………

asons for delay in reporting by the complainant/informant

रीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

articulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ………………

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ………………

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमुद ता वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार श्री. यादव यांचेविरुध्द कुरार पो. ठाणेस केलेल्या फसवणुकीच्या व लैंगिक शोषणाच्या तक्रारीवरुन तक्रारदार यांचेविरुध्द गुन्हा दाखल न करण्या-साठी आ.क्र. १ व २ यांनी दि. २२/०१/२०२६ रोजी तक्रारदारास पोलीस ठाण्यास बोलवून ३,००,०००/- रु लाचेची मागणी करुन २,००,०००/- रु घेतले. दि. ०२/०२/२६ रोजी उर्वरित १,००,०००/- रु. लाचेची मागणी केल्याचे तक्रारदाराने ला.प्र.वि. मु येथे दिलेल्या तक्रारीवरुन दि. १८/०२/२०२६ रोजी केलेल्या पडताळणीमध्ये आ.क्र. १ व २ यांनी १,००,०००/- रु लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने केलेल्या सापळा कारवाईमध्ये आ.क्र. 2 यांनी १ लाख रु लाच तक्रारदाराकडुन स्विकारल्यानंतर पकडले आहे अशा तक्रारीवरुन गुन्हा दाखल

13. केलेली कार्यवाही -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदारांचे नाव व हुद्दा : अनिल चित्तरवाड, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ………………

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ……………… जिल्हा ……………… राज्य ………

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ………………

(3) Transferred to P. S. ………………
District ……………… on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

19.2.26

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name अनिल चित्तरवाड
पदनाम Rank पोलीस निरीक्षक ला.प्र.वि
तपासिक अ. चा कोड क्र. मुंबई
Posting
Code No. of I. O. ………………

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ………………
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report